# मान्यवरांच्या नजरेतून ‘छात्र प्रबोधन’

**‘छात्र प्रबोधन’ च्या तपपूर्तीच्या निमित्ताने अनेक मान्यवरांनी, लेखकांनी छात्र प्रबोधन या मासिकाचा तसेच त्याद्वारा होणाऱ्या विविध उपक्रमांचा परिचय आपल्या लेखात करून दिला. त्यातील काही लेख वृत्तपत्रांमधून, साप्ताहिकांमधून प्रसिद्धही झाले. या सर्वच लेखकांच्या प्रतिक्रिया खूप बोलक्या आहेत. अशा लेखांतील काही निवडक भाग संपादित करून पुढे देत आहोत.**

➢ छात्र प्रबोधनचे नेमके उद्दिष्ट काय? तर विद्यार्थी निव्वळ परीक्षार्थी होऊ नयेत-शिक्षणामुळे त्यांचा व्यक्तिविकास व्हावा, आज बीजरूपात असणाऱ्या त्यांच्या सद्गुणांची जोपासना व्हावी आणि त्यांच्या अंतरात राष्ट्रप्रेमाची ज्योत सतत तेवत राहावी अशा प्रकारची शिकवण लाभलेली ही मुले उद्या उत्तम नागरीक म्हणून नक्कीच राष्ट्राचे आधारस्तंभ ठरणार आहेत.

**- शकुंतला फडणीस**

➢ छात्र म्हणजे विद्यार्थी हा झाला वरवरचा ढोबळ अर्थ. छात्र म्हणजे जो आपल्या कर्तृत्वाच्या बळावर राष्ट्रावर छत्र धरतो; राष्ट्राला तेजस्वी आधार देतो त्याला छात्र म्हणतात.छात्र म्हणजे केवळ वार्षिक परीक्षेत पेपर लिहिणारा नव्हे, जो ज्ञानाची सत्रे पार करीत साऱ्यांना अन्नछत्र देतो तो छात्र असतो. हा अर्थ छात्र प्रबोधनने तंतोतंत खरा ठरवला आहे. या मासिकाचे अधिष्ठान सकारात्मक आहे. त्यात तीन ‘स’कार येतात. संस्कारशीलता, सुसंस्कृतपणा आणि स्वभावशील विज्ञानाची जोड.

**- यशवंत पाठक**

➢ मासिकाचा वयोगट कुमारवयीन आहे म्हणून त्यातील विषयही खास त्या वयाला साजेसे घेतले जातात. कुमारवयीन मुलं संस्कारक्षम असतात. शैशवाचा अवखळपणा संपून मोठं होण्याची त्यांची तनमनाची प्रक्रिया चालू असते. अशा प्रगल्भतेच्या दिशेकडे सरकू पाहणाऱ्या मुलांना साहित्यातून नेमकं काय देता येईल, याचा सखोल अभ्यास करूनच मासिकातील विषयाची मांडणी होते, असे वाटते. जाता-जाता, कळत-नकळत, हितगुज करत कुमारांना सामावून घेत विषय हाताळण्याची मासिकाची पद्धत अनन्यसाधारण आहे.

**- आश्लेषा महाजन**

➢ आपल्या पाल्याच्या वाढत्या वयात विशेषत: त्याच्या किशोर-कुमार अवस्थेत त्याला एखादा थोडा मोठा, प्रगल्भ असा जिवाभावाचा दोस्त असावा लागतो-त्याच्या त्या त्या वयातल्या समस्या, आकांक्षा जाणून घेणारा, त्याच्या अवखळ उत्साहाला नेमकं वळण देणारा, त्याच्या उत्सुक डोळ्यांमध्ये नवी स्वप्नं पेरणारा, त्याच्यासमोर उत्तुंग-भव्य

कवितेने काय दिले ? कवितेने प्राण दिले, थकलेल्या श्वासांना, जगण्याचे भान दिले

दिव्य असे काही ध्येय ठेवणारा. त्याचे मनोरंजन करता करता त्याला नवे शिकविणारा, त्याच्यातील जिज्ञासा जागविणारी कोडी घालणारा, त्याच्या यक्ष प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देणारा आणि त्याच्या कल्पकतेला नि सर्जनशीलतेला आव्हानं पुरविणारा... सर्वांगानं त्याच्या व्यक्तिमत्त्वाला फुलवायला मदत करणारा... ज्ञान प्रबोधिनीच्या 'छात्र प्रबोधन' मासिकानं ही बहुरंगी भूमिका समर्थपणे पेललेली दिसतेय.

**- सुहासिनी देशपांडे**

➢ अबब ! किती अवघड नाव आहे आणि जडही ! 'छात्र प्रबोधन' चा सुरुवातीचा अंक पाहण्यात आल्यावरची माझी ही पहिली प्रतिक्रिया होती. मुलांच्या मासिकाचं हे नाव मला खटकलं होतं. हळूहळू म्हणजे जसजसे पुढचे पुढचे अंक हातात यायला लागले तसतसं लक्षात नव्हे, चांगलं ठसलंच-मनावर की हे प्रकरण चांगलच वेगळं आहे. नाव मोठ्ठं आहे आणि याचं लक्षणही फार मोठ्ठं आहे.

**- उष:प्रभा पागे**

➢ उगवती पिढी अभ्यासाच्या नावावर घरकोंबडी न होता ती उंबरठ्याबाहेर पडावी, पुढे पुढे चालत राहावी, 'चराति चरतो भग:' म्हणून 'चरैवेति चरैवेति' 'चालत रहा, चालत रहा' असा छात्र प्रबोधनचा आग्रह असतो.

**- राम शेवाळकर**

➢ या मासिकाच्या पानापानातून या देशातील मातीचा सुगंध जाणवतो. हे 'देशिकार लेणे' असूनही देशोदेशीच्या शिक्षण आणि संस्कारांच्या क्षेत्रात होणाऱ्या नवनवीन उपक्रमांसाठी या मासिकाने आपली खिडक्या-दारे सताड उघडी ठेवली आहेत.

**- म. वि. कोल्हटकर**

➢ आजच्या प्रदूषित वातावरणात 'छात्र प्रबोधन' मासिक अंगणातील तुळशीसारखं पवित्र कार्य करीत आहे. आणि या तुळसमंजिऱ्यांनी वातावरण शुद्ध होत आहे. छात्र प्रबोधन अंकातील प्रत्येक पानावर त्या लेखावर आधारित कवितेच्या ओळी तळजागेवर वाचतो तेव्हा थक्क होतो. एवढं समर्पक सुचणं आणि ते शैलीसंपन्न असणं ही ईश्वरी कृपा. त्यात पुन्हा हे कोण लिहितं याचा कुठेही उल्लेख नाही. ओळीआडच्या त्या कवीला मी वंदन करतो.

**- दत्ता हलसगीकर**

➢ 'प्रबोधन' ह्या शब्दाला सर्वसाधारण मनुष्य बहुधा बिचकत असतो. प्रबोधन... प्रशिक्षण... प्रचार वगैरे 'प्र'कार हे अनेकदा क्लिष्ट, कंटाळवाणे, अनावश्यक सक्तीने माथी मारलेले. इत्यादी... असण्याचा धोका संभवतो. साहजिकच ते पत्करण्यापेक्षा प्रबोधन टाळण्याकडे सर्वसाधारण मंडळींचा कल राहतो. याला सर्वस्वी अपवाद असणारं एक प्रबोधन गेली बारा वर्षे मराठीमध्ये सुरू आहे. सतत अधिकाधिक लोकांना आकृष्ट करीत आहे. ते आहे ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठी प्रकाशित होत असलेलं मासिक 'छात्र प्रबोधन'.

**- मंगला गोडबोले**

कवितेने शब्द दिला, शब्दाला अर्थ दिला, अर्थाच्या पाठीशी, प्रतिभेचा मंत्र दिला